# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

## वसुलीसाठी नियुक्त एजन्सीबाबत अटी व शर्ती

१) वसुली एजंट/एजन्सी वैयक्तीक, नोंदणीकृत भागीदारी किंवा प्रोप्रायटर फर्म, कॉर्पोरेट संस्था, शासकीय/निमशासकीय संस्था असली पाहिजे.

२) सदर संस्थांच्या व्यवस्थापकीय बोर्डवर चार्टड अकौंटंट, एम.बी.ए., चार्टड इंजिनिअर्स, कायदेशीर व्यावसायिक,निवृत्त पोलिस कर्मचारी इत्यादी व्यवसायिक असावेत.

३) एजन्सीला दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये एक वर्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी वसुली एजन्सी म्हणून कामाचा अनुभव असला पाहिजे.

४) एजन्सीचे प्रवर्तक/कर्मचारी यांनी कर्ज वसुलीसाठी रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

५) एजन्सीला कमिशन/फी/खर्च इत्यादी ठरविण्याची अधिकार बँकेस राहील.

६) निवडण्यात येणाऱ्या एजन्सीने बँकेच्या कायदा विभागाने मंजूर केलेल्या कराराच्या मसूदया नुसार करार करावा लागणार आहे.

७) निवडण्यात येणाऱ्या एजन्सी तथा त्यांच्या कर्मचाऱ्यांची केंद्र आणि स्थानिक कायदयांतर्गत सर्व वैधानिक आवश्यकतांचे पालन केले आहे असे सुनिश्चित केले पाहिजे.

८) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एजन्सीने कर्ज वसुलीची कार्यवाही केली पाहिजे.

९) एजन्सीची नियुक्ती १ वर्षाच्या कालावधीसाठी राहील आणि कामगिरीच्या आधारे नुतनीकरण करण्यात येईल.

१०) सिलबंद प्रस्ताव बँकेच्या वसुली बिगरशेती कर्ज विभागाकडे दि.१७/०९/२०२४ रोजीपर्यंत सकाळी १०.३० ते सायं. ५.३० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

११) शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र/शॉप ॲक्ट लायसन्स्, इन्कम टॅक्स व जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र, आयकर रिटर्न दाखल केल्याचा पुरावा इ.

१२) संबंधित एजन्सीला सरफेसी कायदा २००२ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १०७ अन्वये वसुलीचे कामकाज करावे लागेल.

१३) सर्व्हिस चार्ज, इन्कमटॅक्स ॲक्ट मधील टी.डी.एस. व जी.एस.टी. बाबतच्या तरतूदी विचारात घेऊन कमिशन/फी अदा केली जाईल. तसेच शासनाचे वेळोवेळी कायद्यानुसार होणारे बदल आपणांस बंधनकारक राहतील.

१४) सर्वात कमी रकमेचे दरपत्रक मान्य करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही. सदर संस्थेला असणारा अनुभव व मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता विचारात घेऊन संस्थेची निवड केली जाईल.

१५) बँकेने संमत केलेल्या विहित नमुन्यात करार करणे बंधनकारक राहील.

१६) प्रस्ताव सुचना मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या संस्था प्रस्ताव दाखल करण्यास पात्र होवु शकेल. पात्र संस्थांनी प्रस्तावा समवेत आवश्यक कागदपत्र व परिशिष्टा सह दाखल करावी.

१७) वरील अटी व शर्तीमध्ये वाढ/कमी/दुरुस्त करण्याचा अथवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी